संकलन : देशभक्तकोशकार चंद्रकांत शहासने
मो. ९८८१३७३५८५
ईमेल : chandrakantshahasane@gmail.com

कर्नाळा चॅरिटेबल ट्रस्ट, पुणे
रजि. क्र. ई ८१७७ पुणे

बलिदानाचा इतिहास - आष्टी

संकलन : देशभक्तकोशकार चंद्रकांत शहासने
मो. ९८८१३७३५८५
ईमेल : chandrakantshahasane@gmail.com



दिनांक ८ ऑगस्ट १९४२ राष्ट्रपिता महात्मा गांधीना मुंबईला ऑगस्ट क्रांती मैदानावरून (गोवालिया टँक) इंग्रजांना 'चले जाव' चा आदेश दिला व भारतीय जनतेला 'करो वा मरो' चा संदेश दिला. ह्या सभेला आष्टीचे गोपाळराव वाघ आणि लक्ष्मणराव मोकदम उपस्थित होते.



दिनांक १४ ऑगस्ट १९४२ ला खडकी येथे सभा होऊन महात्माजींचा संदेश वाचून दाखविला. त्यानुसार सोळा ऑगस्ट १९४२ हा दिवस आष्टी पोलीस स्टेशनवर मोर्चा नेण्याचा दिवस ठरला. तशी पत्रके खेड्यात वडाळ्यापर्यंत पाठविण्यात आली.



दिनांक ९ ऑगस्टला आष्टीला संत तुकडोजी महाराजांचा भजनाचा कार्यक्रम होता. त्या कार्यक्रमांमधूनही त्यांनी करो वा मरो चा संदेश 'मारो' म्हणून दिला व फत्तर सारे बॉम्ब बनेंगे, भक्त बनेगी सेना असे भविष्योद्‌गार काढले. आष्टीत चैतन्य संचारले होते.



रविवार १६ ऑगस्ट १९४२, तो नागपंचमीचा दिवस होता. आष्टी गावातील लोक घरगुती कामात होते. गृहिणींनी नागोबा काढले होते. त्या दिवशी शेतातील काम बंद होते. म्हणून सर्वजण गावात होते. आज काय घडणार ह्याची फारशी कल्पना लोकांना नव्हती. गुपचूप निरोप गेले होते. १६ ऑगस्ट १९४२ आष्टीचा क्रांतीदिन खडकीला ठरला व आष्टीने मान्य केला होता.


कर्नाळा चॅरिटेबल ट्रस्ट, पुणे
रजि. क्र. ई ८१७७ पुणे

बलिदानाचा इतिहास - आष्टी

संकलन : देशभक्तकोशकार चंद्रकांत शहासने
मो. ९८८१३७३५८५
ईमेल : chandrakantshahasane@gmail.com



तेवढ्यात वडाळ्यावरुन रामकृष्ण जोमदे आले. आष्टीतील ओळखीच्या माणसांना पाहून घोड्यावरून खाली उतरले. त्यांना पाहून ते म्हणाले,'वडाळ्याचे लोक सकाळीसच यायला निघाले आहेत. मी घोड्यावरून पुढे तुम्हाला सांगण्यासाठी आलो. तुम्ही सर्वजण तयार रहा. मी पांडुरंग दादांना निरोप देऊन येतो' ते पुन्हा घोड्यावर बसून पांडुरंगजीच्या घराच्या दिशेने निघाले.



बाजूच्या गोठ्यात घोडे बांधून ते पांडुरंग दादाकडे आले. त्यांना वडाळ्याचे लोक येत असल्याचे सांगितले. दादांनी ताबडतोब दवंडीवाल्यांना बोलावले. त्याला घंटी वाजवून दवंडी द्यायला सांगितले. त्याने एक ललकारी तेथेच मारली. नवचैतन्य निर्माण झाले होते. प्रथम पोलीसस्टेशनवर शांततेने मोर्चा न्यायचा होता. अनुचित प्रकार होईल हे कोणाच्या ध्यानी मनी नव्हते.



तेवढ्यात वडाळ्यावरुन रामकृष्ण जोमदे आले. आष्टीतील ओळखीच्या माणसांना पाहून घोड्यावरून खाली उतरले. त्यांना पाहून ते म्हणाले,'वडाळ्याचे लोक सकाळीसच यायला निघाले आहेत. मी घोड्यावरून पुढे तुम्हाला सांगण्यासाठी आलो. तुम्ही सर्वजण तयार रहा. मी पांडुरंग दादांना निरोप देऊन येतो' ते पुन्हा घोड्यावर बसून पांडुरंगजीच्या घराच्या दिशेने निघाले.




ठिक दहा वाजता वडाळ्याचे लोक दुरून दिसले. रामभाऊ लोहे, व्यंकटराव ठाकरे, पंची गोंड, उदेभान कुबडे, केशव ढोंगे, झ्यापूजी पोटे, लालजी कोकाटे सोबत शे-दिडशे तरुण घोषणा देत येत होते. व्यंकटराव ठाकरे चे गीत गात होते
जन्मसिध्द हैं हक्क हमारा। होगा भारत प्यारा।।

कर्नाळा चॅरिटेबल ट्रस्ट, पुणे
रजि. क्र. ई ८१७७ पुणे

बलिदानाचा इतिहास - आष्टी

संकलन : देशभक्तकोशकार चंद्रकांत शहासने
मो. ९८८१३७३५८५
ईमेल : chandrakantshahasane@gmail.com



ते पेठ अहमदपूरला आले. मल्लीकार्जुन आप्पांच्या वाड्यासमोर थांबले. आप्पाजी घरी नव्हते. वाड्यासमोर विश्रांतीसाठी खाली बसले. ५-६ कोसावर पायी आल्यामुळे थकवा आला होता. त्यांना तहान लागली होती. पाणी मागण्यात आले. न्याहारी त्यांनी नाल्यावरच के[illegible] नी पुन्हा तहान लागली. सर्वांना पाणी देण्यात आले.



त्यांची वाट पहावी की पुढे चलावे हा आपसात विचार सुरू झाला. काही उत्साही वीर पुढे आले. ते वाट पाहायला तयार नव्हते. केशव ढोंगे म्हणाल, "आधीच उशीर झाला. आता उशीर करणं ठीक नाही." सर्वांनी त्याच्या बाजूने री ओढली. रामभाऊचा निरूपाय झाला. पोलीसस्टेशनकडे चालण्याची त्यांनी सूचना केली.



रामभाऊंनी खडकीचे लोक आले काय म्हणून विचारले. त्यांना उत्तर नाही म्हणून मिळाले. कोणीतरी बोलले. 'अरे बा. त्याहीन काऊन उशीर केला? त्याहीचे गाव तर जरळचं आहे' तसे रामभाऊ म्हणाले, "येतील. आल्याशिवाय राहणार नाही. आपण थोडावेळ त्यांची वाट पाहू. मग निघूं"



शेवटी तो जथा पोलीस स्टेशनच्या दिशेने निघाला. रस्त्याने घोषणा देत होते. सामील होण्याची विनंती करीत होते. ते निशस्त्र होते. झेंड्याशिवाय एकही काठी त्यांच्याजवळ नव्हती. पाटलाने पाठविलेला काठीधारी लोकांच्या जथा त्यांनी वापस केला होता. ते अहिंसेचे सच्चे पुढारी व सच्चे देशभक्त होते.

कर्नाळा चॅरिटेबल ट्रस्ट, पुणे
रजि. क्र. ई ८१७७ पुणे

बलिदानाचा इतिहास - आष्टी

संकलन : देशभक्तकोशकार चंद्रकांत शहासने
मो. ९८८१३७३५८५
ईमेल : chandrakantshahasane@gmail.com



पांडुरंगदादांच्या घराकडून आष्टीला जथा आला. दोन नेत्यांनी हातात हात मिळविला. घोषणांचे आवाज आकाशाला भिडू लागले. उत्साह वाढला होता. लोकांचा महापूर पोलीस स्टेशनच्या दिशेने जात होता. स्वातंत्र्य मिळविण्यासाठी 'करो वा मरो' चा संदेश घेऊन.



सकाळी अकराचा सुमार होता. देशभक्तांचा जत्था फाटकाजवळ येऊन पोहचला. त्यात रामभाऊ लोहे, व्यंकटराव ठाकरे, श्री पांडुरंगजी सव्वालाखे, मोतीरामजी होले, गोविंदराव मालपे, पंचीगोंड केशव ढोंगे, उदेभान कुबड आघाडीवर होते. लोहे म्हणाले, "आम्हाला आंत येऊ द्या. झेंडा चढवू द्या'. इन्स्पेक्टर गरजला, "यह नही होगा."



त्यावेळी रामनाथ मिश्रा दरोगा होता. देशभक्तांच्या गगनभेदी गर्जना पोलीस स्टेशनमध्ये ऐकू येऊ लागल्या. इन्स्पेक्टरने फाटक बंद करण्यास सांगितले. सर्वांना हुश्शारचा आदेश दिला. त्यावेळी तेथे ३ जमादार आणि ५ पोलीस होते. इन्स्पेक्टरने त्यांना योग्य त्या सूचना दिल्या.



"क्यों नही आने देते? पांडुरंग दादांचा आवाज, "आप अकेले नही है! दादा आपके साथ ये सेना है।" इन्स्पेक्टर. जमावाने घोषणा दिली, 'भारत माता की जय - महात्मा गांधी की जय ' देशभक्तांच्या गगनभेदी जयजयकाराने दरोगा नरमला. आणि काही लोकांना आत घेण्यास राजी झाला.

कर्नाळा चॅरिटेबल ट्रस्ट, पुणे
रजि. क्र. ई ८१७७ पुणे

बलिदानाचा इतिहास - आष्टी

संकलन : देशभक्तकोशकार चंद्रकांत शहासने
मो. ९८८१३७३५८५
ईमेल : chandrakantshahasane@gmail.com




फाटक उघडलं गेल्यावर पुढारी मंडळी आत आली. त्यांच्यासोबत सत्याग्रहीचा लोंढा आपोआप आत आला. लोहेंनी सर्वांना शांत बसविले. त्यांनी शांतपणे आपली भूमिका मांडली. आपण येथे 'करो वा मरो' या गांधीजींच्या संदेशावरून आलो आहोत. तिरंगी झेंडा चढविणं व रेकार्ड जाळणं हे आपलं काम.'



दरोग्याच्या मनांत वेगळे विचार आले. त्याने गुपचूप ह्या नेत्यांना पकडण्याचा आदेश एका शिपायाला दिला. लोक दरोग्यावर बारकाईने लक्ष ठेवून होते. त्यांनी तो ऐकला. ते खळवळले. बाचाबाची सुरू झाली. त्यांना आवरणे कठीण झाले. काही लोक पोलीस स्टेशनमध्ये घुसले. काही घोषणा देत होते. नेते शांत राहण्यास सांगत होते, पण व्यर्थ.



लोहे म्हणाले, 'आपण हिंसाचार करू नये. गोळीबार झाला तरी विरोध करू नये. आपण बहुसंख्य आहोत. तेवढ्या गोळ्या ह्यांच्या जवळ नाहीत. (टाळ्या) पांडुरंग सव्वालाखेंनी दुजोरा दिला. लोहे पुन्हा म्हणाले, 'ज्यांना बंदुकीची भिती वाटते त्यांनी आताच येथून निघून जावं' ४ - ५ भित्री माणसे उठून निघून गेली.




समद जमादार गांगरून गेला. त्याने पहिली गोळी झाडली. ती डॉ. मालपेला लागली. त्या दिवशी ते जेवण न करताच आले होते. अन्ना ऐवजी गोळी त्यांच्या पोटात गेली. पोटावर हात ठेऊन ते अंधारी आल्यासारखे गर्दीच्या रेट्याने बाहेर फेकले गेले.

कर्नाळा चॅरिटेबल ट्रस्ट, पुणे
रजि. क्र. ई ८१७७ पुणे

बलिदानाचा इतिहास - आष्टी


संकलन : देशभक्तकोशकार चंद्रकांत शहासने
मो. ९८८१३७३५८५
ईमेल : chandrakantshahasane@gmail.com




नबाब रशिद खाँ कपौंडच्या बाहेर उभे होते. एक गोळी सू-सू करीत आली व पोटरीत लागली. पोटरीतून घळाघळा रक्त पाहू लागलेळ. नबाब खाली कोसळले. लोक धावले. काही घराकडे पळायला लागले. सर्वत्र धावपळ सुरू झाली. गोळीबार सुरूच होता.



बेछूट गोळीबार सुरू होता. गर्दीतून आवाज आला, 'भारत माताकी जय'। तो आवाज होता वड़ाळ्याच्या उदेभान कुबडेचा. भारतमातेचा जयजयकार त्या नराधमांना कसा खपणार? बंदुक त्याच्याकडे वळली. नेम धरून गोळी छातीवर बसली. दोन्ही हात छातीशी धरून वीर कोसळला. भारतमातेच्या कुशीत.



वडाळ्याचा केशव ढोंगे, नव्या दमाचा तरूण, सहा महिन्यापूर्वी त्याचे लग्न झाले होते. पोलीस स्टेशनच्या दिशेने धावला. एक गोळी सू-सू करीत आली. गोळी नरड्याला लागली. दोन्ही हातांनी गळा दाबून धरला. अंधारी येऊन जमिनीवर कोसळला. धन्य तो वीर! एक गोळी सू-सू करीत झ्यापूजीच्या पायाला लागली. ते विव्हळून खाली पडले.



'अरे त्यांना कशाला मारता, मी त्यांना आणले, मला मारा' रामभाऊ जीवाच्या आकांताने ओरडले होते. स्वत:हून गोळीला सामोरे जात होते. त्यांच्या रोखाने बंदुक वळली. अण्णाजी धुडे त्यांना रोखण्याचा प्रयत्न करीत होते. बंदुकीचा चाप ओढला गेला, गोळी सुटली, पण लोहेंना लागली नाही.

कर्नाळा चॅरिटेबल ट्रस्ट, पुणे
रजि. क्र. ई ८१७७ पुणे

बलिदानाचा इतिहास - आष्टी

संकलन : देशभक्तकोशकार चंद्रकांत शहासने
मो. ९८८१३७३५८५
ईमेल : chandrakantshahasane@gmail.com



रामभाऊच्या रोखात गोळी येत आहे असे पाहून त्यांच्यावर जीवापाड प्रेम करणारा पंची गोंड तिरासारखा धावला. गोळी त्यांने आपल्या छातीवर झेलली. आपल्या नेत्याला वाचविण्यासाठी एका अशिक्षीत उघड्या नागड्या आदीवासीच केवढं मोठ बलीदान. त्याची सर कोणालाच येणार नाही.



समदची बंदुक आग ओकू लागली. पहिली गोळी रामभाऊला चाटून गेली. दुसरी गोळी छातीच्या बाजूला लागली. तरी रामभाऊ पडत नाही हे पाहिल्यावर त्याने तिसरी गोळी पायावर मारली. गोळी पोटरीत घुसली. रामभाऊ खाली पडले.



समदला धुंदी चढली होती. त्याने पुन्हा बंदुक रामभाऊवर रोखली. आपल्याला ह्यांनी अनेक वेळा जेऊ घातले हे तो विसरला. पिशाच्च जागा झाल्यावर भान कुठून असणार! समद रामभाऊला गोळी मारेल असं कोणालाही वाटलं नाही. पण तसं घडलं. त्याने रामभाऊवर गोळीबार सुरू केला.




रामभाऊ पडले हे पाहताच लालजी कोकाटे, व्यंकटराव ठाकरे, श्रावण मास्तर, रामकृष्ण जोमदे धावून आले. व्यंकटराव ठाकरेनं रामभाऊला सावरलं. ते दृष्य पाहून भित्रे लोक पळू लागले. तानाजी पडल्यावर मराठे पळायला लागले होते तसे.

कर्नाळा चॅरिटेबल ट्रस्ट, पुणे
रजि. क्र. ई ८१७७ पुणे

बलिदानाचा इतिहास - आष्टी

संकलन : देशभक्तकोशकार चंद्रकांत शहासने
मो. ९८८१३७३५८५
ईमेल : chandrakantshahasane@gmail.com



लोक पळाल्याचे पाहून दरोग्याने गोळीबार थाबवला. त्यानं पोलिसांना काही गुप्त सूचना दिल्या. ह्या संधीचा फायदा घेऊन लालजी कोकाटे, व्यंकटराव ठाकरे, रामकृष्ण जोमदे ह्यांनी त्रामभाऊला व इयापूजीला उचलले व दवाखान्याकडे नेले. डॉ. मालपेला आणि नवाबला आधीच नेण्यात आलं होतं.



तो तारातून बाहेर गेला. फाटक बंद झाले होते. त्याने रामकृष्ण जोमदेला सोबत घेतले. विंहिरीवरची दोरबादली घेतली व पाणी आणले. आतून दरडावणीचा आवाज आला- 'खबरदार पाणी पाजाल तर', बादली दोर तेथेच टाकून ते निघून गेले.



परंतु ह्या रणसंग्रामाचे खरे शूरवीर : केशव ढोगे, उदेभान कुबडे आणि पंची गोंड हे तेथेच तळमळत होते. अंगातून रक्त गेल्यामुळे त्यांना गुंगी आली होती. उन्हात तशा वेळी ते पाणी पाणी करुन विव्हळत होते. पण आवाज येत नव्हता. ते क्षणाक्षणाला क्षीण होत होते. पंची गोंडाचा भाऊ हे झाडाआडुन पाहत होता, पण करणार काय! असहाय होता.



दरोग्यानं शिपायांना गुप्त संदेश दिला. कारण त्याने पांडुरंग सव्वालाखे आणि मोतीराम होलेला भिंतीमागे पाहिले होते. ते गुपचूप मागून गेले व नकळत दोघांनाही पकडले. त्यांनी सुटण्याचा कसून प्रयत्न केला, पण व्यर्थ.

कर्नाळा चॅरिटेबल ट्रस्ट, पुणे
रजि. क्र. ई ८१७७ पुणे

बलिदानाचा इतिहास - आष्टी

संकलन : देशभक्तकोशकार चंद्रकांत शहासने
मो. ९८८१३७३५८५
ईमेल : chandrakantshahasane@gmail.com



त्यानंतर सर्व शिपायी धावले. त्यांनी पांडुरंगजी व मोतीरामजीला फरफटत पोलीस स्टेशनमध्ये आणले व हवालातीत बंद केले. कुलूप लावले व एका शिपायाला तेथेच पाहारा देण्यास सांगितले.



आष्टीला त्यावेळी फार मोठ्या सोई नव्हत्या. त्यामुळे प्रथमोपचाराशिवाय काही सोय नव्हती. त्यांच्यावर प्रथमोपचार करण्यात आला. परंतु काहींची स्थिती गंभीर होती. म्हणून डॉ. पाचघरे जखमींना आर्वीला नेण्याच्या तयारीला लागले.



त्या लोकांनी जखमींना दवाखान्यात आणले. त्यावेळी डॉ. कामत सरकारी डॉक्टर होते. ते जखमींना आत घेण्यास तयार-नव्हते. त्यांचाही नोकरीचा प्रश्न होता. सर्वांनी हात जोडले. विनंती केली. शेवटी डॉ. पाचघरे आले. त्यांच्या विनंतीला मान देऊन त्यांनी जखमींना आत घेतले.



गोळीबार झाला आणि लोक जखमी झालेत ही बातमी वाऱ्यासारखी गावभर पसरली. जखमींना पाहण्यासाठी दवाखान्या बाहेर लोकांनी गर्दी केली. त्यांना आत येण्यास मनाई होती. म्हणून सर्वजण बाहेर उभे होते.


कर्नाळा चॅरिटेबल ट्रस्ट, पुणे
रजि. क्र. ई ८१७७ पुणे

बलिदानाचा इतिहास - आष्टी

संकलन : देशभक्तकोशकार चंद्रकांत शहासने
मो. ९८८१३७३५८५
ईमेल : chandrakantshahasane@gmail.com



इकडे गावात गणपत भोई अंगात आल्यासारखा नाचत होता. त्याच्या हातात रिकामी बंदूक होती. त्या धुमश्चक्रीत त्याने ती पोलीस स्टेशनमधून पळविली होती. आपला पराक्रम लोकांना दाखून तो बेभान होऊन नाचत होता. लोक त्याच्याकडे आश्चर्यने पहात होते. क्रांतीदिनाचा मध्यांतर झाला होता.



रामकृष्ण जोमदेच्या तोंडातून शब्दाऐवजी हुंदके येत होते. ते घोड्यावरुन उतरून मटकन खाली बसले. काहीतरी विपरीत घडल्याची जाणीव झाली. लोक त्यांच्याभोवती जमले. त्यांनी रडत रडत सारी हकीगत सांगीतली. सारे हैराण झाले. त्यांचे सांत्वन करण्याचेही भान नव्हते.



पोलीस स्टेशनमध्ये शिरकाव कठीण आहे हे पाहून रामकृष्ण जोमदे गावात गेले आणि घोडीवर बसून खडकीच्या दिशेने निघाले. भगोतीच्या नाल्याजवळ त्यांना खडकीचे लोक दिसले. खडकी, सिरसोली, परसोडा, भारसवाडा, येरवंडली, किन्हाळा, पिपळा, शिरी, नांदोरा, टेकोडा, वाघोली सर्वच गावचे लोक होते. रामकृष्ण त्यांच्या जवळ गेले. त्यांचे रक्ताने माखलेले कावरेबावरे रूप पाहून मंडळी चमकली.



लोक कुजबूज करू लागले. 'पोलीस कातावले आहेत, आता आपली बरी सोय नाही.' 'सारे लोक तर पळाले, तिथं आपला काय निभाव लागणार' काही जणांची भितीने बोबडी वळली. काहीजण वापस जाण्याची भाषा बोलूं लागले. सर्वांचे चेहरे उतरले होते. आंदोलनाचा उत्साह मावळला होता.

कर्नाळा चॅरिटेबल ट्रस्ट, पुणे
रजि. क्र. ई ८१७७ पुणे

बलिदानाचा इतिहास - आष्टी

संकलन : देशभक्तकोशकार चंद्रकांत शहासने
मो. ९८८१३७३५८५
ईमेल : chandrakantshahasane@gmail.com



येवढ्यात विजेसारखी कासाबाई कडाडली ' अरे ढमक्यांनो, येवढे नामर्द होते तर आलेय कशाले? आताही जायचं अशीन तर वापस जावा. पण जाण्याआधी आमचे बायकांचे ड्रेस चढवा आणि बांगड्या भरा. आम्ही बायातरी तुमच्या पेक्षा लाखपटीने बऱ्या आहोत. जा ..... चालते व्हा.'



नारायण मुंदाने म्हणाले, ''तुकडोजी महाराज की'' सर्वांनी पुन्हा जयजयकार केला. बदला घेण्याची भाषा त्यांच्या तोंडात आली. 'पत्थर सारे बाँब बनेंगे, ' बाबाचं वाक्य त्यांना आठवलं. पत्थर बाँब गोळा करणे तेथूनच सुरू झाले. प्रत्येकानी ओटा करुन त्यात दगड वेचणे चालू केले.



लोक भणकून गेले. त्यांच्यातील मर्दपणा जागा झाला. तसे गुलाबराव पुढे झाले व म्हणाले, 'भारत माता की जय'. सर्वांनी मोठ्यांने जयजयकार केला. भीती तर पळाली होती. त्यांना स्फुरण चढलं होतं. गुलाबराव म्हणाले,'' आपण हिमतीने गेलो तर सात शिपाई चटणीले उरणार नाही.''



गावांतून जात असतांना आष्टीचे लोकही जत्थ्यात सामील झाले. लोकांना स्फुरण चढले होते. निर्धाराची नशा चढली होती. गांधींचा व तुकडोजींचा जयजयकार त्यांना स्फूर्ती देत होता. जथ्याच्या समोर कालेखां नाचू लागला. तो ओरडत होता., 'पोलीस थाना जायेंगे। बदला लेके रहेंगे'।

कर्नाळा चॅरिटेबल ट्रस्ट, पुणे
रजि. क्र. ई ८१७७ पुणे

बलिदानाचा इतिहास - आष्टी

संकलन : देशभक्तकोशकार चंद्रकांत शहासने
मो. ९८८१३७३५८५
ईमेल : chandrakantshahasane@gmail.com



जथा दवाखान्याजवळ आला. आता जमाव फुगला होता. अंतोरा, खंबेत, किन्ही, देलवाडी, लहान आर्वीचे सत्याग्रही मोर्च्यात सामील झाले होते. 'भारत माता की जय' ललकारी सुरू होती. ती ऐकून जखमींना जखमांचा विसर पडला होता.



आता तो अथांग जनसमूह सागरा सारखा पोलीस स्टेशनकडे निघाला. तत्योबा, शामराव, साहेबराव, जामरान, चंद्रभान, नारायणराव, वामनराव विष्णुजी, (दौलतराव,)मारोतराव, रंगराव आंबेकर, पंजाब मानकर, वासुदेव सोनार - किती नावे घ्यावी!अनेक खेड्यातून हा जनप्रवाह आला होता. सोबत ६० - ६५ बाया होत्या.



गूलाबराव, शामराव, वगैरे मंडळी व काही बाया जखमींची विचारपूस करण्यासाठी आत गेले. 'काऊन घाई केली? मले त येऊ याचं होतं' गुलाबराव म्हणाले, 'रामभाऊंनी फक्त डोळे किलकिले करुन त्यांच्याकडे पाहिले. त्यांच्या डोळ्यात आनंदाश्रू व चेहऱ्यावर स्मित झळकले.



ते फाटका जवळ येऊन पोहोचले. फाटक बंद होते. दरोग्यासहीत सर्वजण बंदुका रोखून उभे होते. 'खबरदार' म्हणून मिश्राने हवेत गोळी झाडली. जमावातून ललकारी आली, ''भारत माता की - जय' गुलाबराव म्हणाले, 'आम्हाला जखमींना पाणी पाजू द्या' दरोगा म्हणाला, 'वह मर गये है।''

कर्नाळा चॅरिटेबल ट्रस्ट, पुणे
रजि. क्र. ई ८१७७ पुणे

बलिदानाचा इतिहास - आष्टी

संकलन : देशभक्तकोशकार चंद्रकांत शहासने
मो. ९८८१३७३५८५
ईमेल : chandrakantshahasane@gmail.com



गुलाबरावांनी फाटकावर चढून आंत उडी घेतली. त्यांचे अनुकरण इतरही करू लागले. गुलाबराव धोतरात पाय अडकून खाली पडले. दरोग्याने मारलेली गोळी त्यांना लागली नाही. त्यांनी तुकडोजी बाबांचे व गांधीजीचे आभार मानले व उठले.



परंतु लोकांनी आडोशाला मोर्चेबांधणी केली होती व तेथून दगडाचा मारा सुरु केला. दरोगा व पोलीस दगड कोठून येतात ह्याचा शोध घेऊ लागले. आता फाटकाकडे त्यांचे दुर्लक्ष होते. दगडांचा मारा अचूक होत होता. काय करावे त्यांना सुचत नव्हते.



जेव्हा गुलाबरावांनी फाटकावरून उडी मारली, त्यावेळी दरोग्याने त्यांच्या दिशेने बंदूक वळवून नेम धरला आणि चाप ओढायच्या वेळी एक दगड दाणदिशी त्याच्या हाताजवळ बंदुकीवर बसला. गोळी हवेत उडाली व इन्स्पेक्टर चिडून दगड मारणाऱ्याला हेरू लागला.



इकडे दरोग्यावर दगड बरसल्याचे पाहून लोकांची शक्ती वाढली व त्या शक्तीने फाटकावर धडक मारताच फाटक पिलरसहित जमीनदोस्त झाले. लोंढा आत घुसला व त्याने पोलीसस्टेशनला वेढा दिला. दगड मारणारे पोलिसांना हलू देत नव्हते. त्यामुळे घुसणारे निर्धारपणे घुसले.

कर्नाळा चॅरिटेबल ट्रस्ट, पुणे
रजि. क्र. ई ८१७७ पुणे

बलिदानाचा इतिहास - आष्टी

संकलन : देशभक्तकोशकार चंद्रकांत शहासने
मो. ९८८१३७३५८५
ईमेल : chandrakantshahasane@gmail.com



इकडे दगड बरोबर लागला की नाही हे पाहण्यासाठी वासुदेव सोनाराने झाडा आडून तोंड बाहेर काढले. दरोगा वेध घेत होता. त्यांची गोळी वासूदेव सोनाराच्या हनवटीला लागली व भळभळा रक्त जाऊ लागले तसे खंबीतचे कृष्णराव व लोंक धावले व त्यांना सावरले.



स्त्रियांवर गोळीबार करणारे पोलीसही आष्टीलाच दिसले. त्यांनी स्त्रियांवर गोळीबार केला. एक गोळी कासाबाईच्या हाताला लागली. ते पाहून मंजुळाबाई धावून आली. कासाबाई गरजली, 'माझ्या रक्ताकडे पाहू नका. मरा पण कोणी माघार ऊ नका' त्यामुळे लोकांना आणखी स्फुरण चढले.



गोटमार जोरात सुरू झाली. पोलीस ठाण्यावर गोटमार करणाऱ्या स्त्रिया स्वातंत्र्याच्या इतिहासात कोठेच झाल्या नाहीत. आष्टीला मात्र ते आश्चर्य घडले. स्त्रियांनी राणी लक्ष्मीबाई आणि दुर्गेचे रूप घेतले होते. त्यांच्या हातात गोट्यांची शस्त्रे होती. तो देखावा विलक्षण, भयंकर होता.



एक गोळी अहिल्याबाईंच्या दंडाला लागली. रक्त येऊ लागले. ती म्हणाली. भिऊ नका, 'देशासाठी मरण्याची वेळ पुन्हा येत नाही. अरे दुष्मनांनो, आया बहिणीवर गोळ्या घालतांना तुम्हाला लाज कशी वाटत नाही? तुमच्या बायकांवर गोटमार करून त्यांना जाळले तर कसे वाटेल?' पोलीस मनांत भ्याले.

कर्नाळा चॅरिटेबल ट्रस्ट, पुणे
रजि. क्र. ई ८१७७ पुणे

बलिदानाचा इतिहास - आष्टी


संकलन : देशभक्तकोशकार चंद्रकांत शहासने
मो. ९८८१३७३५८५
ईमेल : chandrakantshahasane@gmail.com



त्या वाक्याने पोलीस खरोखरीच घाबरले. त्यांच्या गोळ्या संपल्या होत्या. गोटमारीने उग्र रूप धारण केले होते. अहिल्याबाईच्या वाक्याने ते चरकले. दरोग्याला एकटे टाकून ते पळाले. त्यांना प्राणाची भीती होती. कुंटुंबियांची काळजी होती. म्हणून जीव वाचविण्यासाठी पळाले.



पोलीस पळाल्याचे पाहून लोक इमारतीत घुसले. त्यांनी हवालतीचे कुलूप फोडले. पांडुरंग सव्वालाखे आणि मोतीराम होलेला हवालतीत बंद केले होते. त्यांना सोडविले. मोर्चाचे बिकट स्वरुप पाहून त्यांना वाईट वाटले. पोलिसांच्या कुटुंबियांचे काही बरेवाईट होऊ नये म्हणून ते गेले.



लालसिंग सर्वात लठ्ठ जमादार होता. त्याच्याजवळ काठी होती. त्याला पळतांना पंजाब मानकरने पाहिले. एक दगड त्याच्या गुडघ्यावर मारला, लालसिंग पडला. त्यांचीच काठी घेऊन त्याला झोडपणे सुरू केले. तिकडे दरोग्याचे लक्ष गेले. त्याने गोळीबार केला. छर्रा पोटरीत घुसला. तसाच पंजाब दवाखान्याकडे पळाला.



आता दरोगा एकटा होता. 'फूंक दूंगा' म्हणून भिती दाखवीत होता. ते पाहून खडकीच्या हरीलालला वाटले की त्याच्या बंदुकीत गोळीच नाही. तो दरोग्याच्या दिशेने झेपावला. दरोग्याचीं बंदूक हिसकवण्यासाठी कासाबाई, मनकर्णाबाई, मंजुळाबाई त्याला, 'अरे थांब थांब' म्हणत होत्या.

कर्नाळा चॅरिटेबल ट्रस्ट, पुणे
रजि. क्र. ई ८१७७ पुणे

बलिदानाचा इतिहास - आष्टी

संकलन : देशभक्तकोशकार चंद्रकांत शहासने
मो. ९८८१३७३५८५
ईमेल : chandrakantshahasane@gmail.com



दरोग्याने ते पाहिले. बंदूक हरीलाल कडे वळली. बंदूक कडाडली. गोळी नेम धरुन बसली. तिने हरीलालचा कंठबिंदू छेदला. त्याने हात आपल्या गळ्याला लावला. ते दृष्य भयावह होते. सर्व चिडले, 'आता दरोग्याला जिता ठेवायचा नाही.' एकच आरोळी आली.



हरीलाल मेल्याचे अैकताच नत्थोबाता बाप धावत जाऊन नत्थोबावर खेकसला. तो झाडा आडून गोटमार करीत होता. म्हाताऱ्याचे हरीलालवर पोराप्रमाणे प्रेम होते. पोरका मुलगा त्याने वागविला होता. पूर्ण खडकी गावचे त्यांच्यावर प्रेम होते. त्यामुळे सर्वजण चवताळले.



हरीलालला धरण्यासाठी मंजुळाबाई, मंजुबाई, शांताबाई धावल्या. त्यांनी त्याला उचललं. त्याचे शरीर अखेरचे झटके देत होते. बाया मोठ्याने रडल्या. दरोग्याला शिव्याशाप देऊ लागल्या. त्यांचे मातृत्व जागे झाले. पण! काय उपयोग हरीलालने प्राण सोडला. सर्वत्र एकच आवाज - 'हरीलाल मेला.'



आता एकट्या दरोग्यावर दगडांचा वर्षाव चारही बाजूंनी होऊ लागला. जीव वाचविण्यासाठी तो जमावाच्या दिशेने जावू लागला. एक महाकाय दगड त्याच्या कपाळावर बसला. कपाळातून रक्त येऊ लागले. तरी तो बंदूक हातातून सोडत नव्हता.

कर्नाळा चॅरिटेबल ट्रस्ट, पुणे
रजि. क्र. ई ८१७७ पुणे

बलिदानाचा इतिहास - आष्टी

संकलन : देशभक्तकोशकार चंद्रकांत शहासने
मो. ९८८१३७३५८५
ईमेल : chandrakantshahasane@gmail.com



नारायण मुंदानेनं लाठी हाणून त्याची बंदूक पाडली. तो निशस्त्र झाला. त्याचे हात जोडले गेले. हरीलालच्या कंठात गोळी घालणारा तो पापी क्षमा मागत होता. दयेची भीक मागत होता. दया कोणालाही त्याची येत नव्हती, उलट जवळ आल्यामुळे मोठे दगड बरसू लागले.



तिकडे हवालतीतून सुटका झाल्यावर पांडुरंग सव्वालाखे व मोतीराम होले ह्यांनी इन्स्पेक्टरच्या क्वार्टरकडे जाऊन तेथे जमलेल्या सर्व स्त्रियांना सुरक्षित स्थळी चालण्याची विनंती केली. दक्षता म्हणून त्यांना संरक्षण देऊन विवेधर भागीवच्या आवारांतील देवळात नेऊन ठेवला.



शेवटी एक मोठा दगड त्याचे टाळक्यावर बसून तो कोसळला. प्रक्षुब्ध जमावाने हातात मिळेल त्या वस्तूने त्याला ठेचले. काठ्या, लाथा-बुख्या, प्रत्येक जण आपला राग काढत होते. जमाव अनावर होता. खून चढला होता. त्यामुळे दरोग्याचा त्यांनी फडशा पाडला होता.



पोलीस स्टेशनचा जमावाने ताबा घेतला होता. सव्वालाखे आणि होलेंना सोडविले होते. तेवढ्यात जयस्वालच्या दुकानातून बापूराव कामडीने काढून दिलेले रॉकेलची पिंपे लोकांना दिसली. ते पोलीस क्वार्टर जाळण्यासाठी नेत होते. काही लोकांनी त्यातील पिंपे घेऊन कागदपत्राला आग लावली. पाहता पाहता पोलीस स्टेशन पेटले.

कर्नाळा चॅरिटेबल ट्रस्ट, पुणे
रजि. क्र. ई ८१७७ पुणे

बलिदानाचा इतिहास - आष्टी

संकलन : देशभक्तकोशकार चंद्रकांत शहासने
मो. ९८८१३७३५८५
ईमेल : chandrakantshahasane@gmail.com




तिकडे पोलीस क्वार्टरला आग लावण्यात आली. विनायक जमादार गाद्यांमध्ये लपला होता. लालसिंग व महादेव प्रसाद इंधनाच्या सुडीत होते. सुड पेटवून दिली. विनायक जमादारालाही त्या आगीत टाकण्यात आले. आता जमावाला नशा चढली होती.



समद सापडल्याबरोबर सर्वजण त्याच्यावर तुटून पडले. त्याचे तंगडे धरून त्याला फरफटत आणले. त्याच्यावर लाथा बुक्क्या, काठ्या, दगडाचा मार बसू लागला व तो विनवणी करू लागला. पण ऐकतो कोण! सर्वजण त्याला मिळेल त्या वस्तुने मारत होते.



परंतु गोळीबाराचा सूत्रधार समद मात्र जंगलात पळाला होता. त्याला पाहण्यासाठी लक्ष्मण वाघ, नागोराव मोरे, पांडुरंग खटाळे, शामराव डांगे, उकंड्या भोयी, दाजीबा मळसणे, कालेखा आघाडीवर होते. नदी, नाले, टेकड्या तुडवून काढल्या आणि समदचा शोध लावला.



मार बसूनही समद मरत नाही असे पाहिल्यावर त्याचे हातपाय बांधून त्याला काठीला बांधून बुडविण्यात आले. मेला की नाही हे पाहायचे व पुन्हा डुंबवायचे. शेवटी गुदमरून तो मेला. त्याचे प्रेत तेथेच टाकले. ते कुत्र्यांनी खाल्ले.

कर्नाळा चॅरिटेबल ट्रस्ट, पुणे
रजि. क्र. ई ८१७७ पुणे

बलिदानाचा इतिहास - आष्टी

संकलन : देशभक्तकोशकार चंद्रकांत शहासने
मो. ९८८१३७३५८५
ईमेल : chandrakantshahasane@gmail.com



रात्री सर्व शहिदांची अन्तयात्रा निघाली. त्याला पूर्ण गाव हजर होते. आष्टी वडाळ्यांच्या शहीद्यासोबत इन्स्पेक्टरचे प्रेत त्याच्या पत्नीच्या परवानगीने घेतले होते. ही अभूतपूर्व अन्तयात्रा बाकळी नदीच्या काठावर आली.




तेथून सारेजण गांधीचौकात आले. तेथे डॉ. बळीराम मालपे यांचे अध्यक्षतेखाली सभा झाली. सव्वालाखेचे हृदयद्रावक भाषण झाले. देशाला स्वातंत्र्य मिळण्यास आता फारच थोडा अवकाश आहे. तोपर्यंत यातना सहन कराव्या लागतील, पोलीसांचा मार, पोलीस कोठडी, फाशी ह्यासाठी सज्ज राहा किंवा भूमिगत व्हा. आष्टीने घडविलेला हा रोमांचक इतिहास सदैव स्मरणात राहील.



बाकळी नदीच्या काठावर सरण रचून सर्व शहिदांना एकत्र दहन करण्यात आले. त्याच्या ज्वाला आकाशाला भिडल्या. त्या सांगत सुटल्या - 'इस मिट्टीसे तिलक करो, यह धरती है बलिदान की।' सर्वांनी तेथील चिमूटभर माती कपाळाला लावून प्रतिज्ञा केली, 'कोणी कोणाचे नांव सांगणार नाही' सर्व मौन होते. सर्वांना उद्याची काळजी लागली होती.

क्रांतीदिनी बाकळी नदीच्या काठावर जेथे पंची गोंड, केशव ढोंग, उदेभान कुबडे आणि गोविंद मालपे ह्यांना अग्नी दिला. त्या जागेवर शहीद स्मारक उभे आहे. तेथे रस्त्याने येणारा जाणारा प्रत्येकजण नतमस्तक होतो..ते स्मारक सांगत आहे....

जो शहीद हुये है उनकी जरा याद करो कुरबानी



कर्नाळा चॅरिटेबल ट्रस्ट, पुणे
रजि. क्र. ई ८१७७ पुणे

बलिदानाचा इतिहास - आष्टी

संकलन : देशभक्तकोशकार चंद्रकांत शहासने
मो. ९८८१३७३५८५
ईमेल : chandrakantshahasane@gmail.com

परिशिष्ट १ क्रांतीदिन आरोपी व शिक्षा

(५-१२-४२ ला विशेष न्यायालयातर्फे शिक्षा सुनावण्यात आलेले आरोपी)

फांशी

आरोपी क्र. २ श्री. पांडुरंग जैराम कलार
आरोपी क्र.१२ श्री. रघुनाथ पांडुरंग कुंभार
आरोपी क्र.१३ श्री. तुळशीराम सखाराम पांचघरे
आरोपी क्र.१६ श्री. तुकाराम रामजी मुकदम
आरोपी क्र.२५ श्री. वामन बळीराम तेली
आरोपी क्र.४२ श्री. हुकड्या आनंदवाव भोई
आरोपी क्र.४६ श्री. कालेखान विलायतखान
आरोपी क्र.५२ श्री. नत्थू श्रीराम माळी
आरोपी क्र.६० श्री. माधव श्रावण देशमुख
आरोपी क्र.८९ श्री. गुलाबराव विठ्ठलराव (सिडसोली)

जन्मठेप

आरोपी क्र.१ श्री. महादेव बळीराम सव्वालाखे
आरोपी क्र.३ श्री. मोतीराम चैतू गौंड
आरोपी क्र.६ श्री. काशीराम बळीराम मालपे
आरोपी क्र.७ श्री. श्रावण जानबा सुतार
आरोपी क्र.८ श्री. बापुराव कृष्णराव मालपे
आरोपी क्र.९ श्री. गणपत विठू माळी
आरोपी क्र.१७ श्री. लोदग्या कचऱ्या कोतवाल
आरोपी क्र.२० श्री. विनायक बापूराव बाम्हण
आरोपी क्र.२१ श्री. चंपक हमदग्या भोई
आरोपी क्र.२२ श्री. उघ्या गणपत कासार
आरोपी क्र.२४ श्री. बापूराव माधव तेली
आरोपी क्र.२७ श्री. रामभाऊ शिवराम पाटील
आरोपी क्र.२८ श्री. सूर्यभान शिवराव पाटील
आरोपी क्र.३० श्री. राजाराम शिवा भोई
आरोपी क्र.३२ श्री. इशराम बापूजी तेली
आरोपी क्र.३३ श्री. इठ्या सखाराम माळी
आरोपी क्र.३६ श्री. बापूराव नत्थू तेली
आरोपी क्र.३७ श्री. नागो गणपत गुरव
आरोपी क्र.३८ श्री. मारोती राजाराम गुरव
आरोपी क्र.३९ श्री. मल्लीकार्जुन नारायणप्पा गवळी
आरोपी क्र.४० श्री. माधोराव नारायण मुकदम
आरोपी क्र.४१ श्री. रामा चैतू गोड
आरोपी क्र.४२ श्री. शंकर तुळशीराम कुणबी
आरोपी क्र.४५ श्री. शिवराम पैकू माळी
आरोपी क्र.४७ श्री. मनिराम लक्ष्मण माळी
आरोपी क्र.४८ श्री. मारोती भानाजी माळी

(केंद्रसरकारतर्फे फाशी रद्द : १८ ऑगस्ट १९४५)

१. श्री. तुळशीराम पाचघरे
२. श्री. उकड्या आनंदराव भोई

निरनिराळ्या मुदतीच्या शिक्षा

१) श्री मणिराम लक्ष्मणराव काळे (आष्टी)
२) श्री शिवराम पैकाजी लेकुरवाळे (आष्टी)
३) श्री विठू सखाराम वैराळे (आष्टी)
४) श्री नामदेव बळीराम कासुलकर (आष्टी)
५) श्री लक्ष्मण रामजी बोराडे (आष्टी)
६) श्री नारायण सिताराम विंचूरकर (आष्टी)
७) श्री नत्थू गोविंद ढोले (आष्टी)
८) श्री विश्राम बापूजी ढबाले (आष्टी)
९) श्री नंदलाल मनसुखदास राठी (खंबीत)
११) श्री मनोहर प्रेमसुखदास (खंबीत)
१२) श्री महादेव खोडे (खंबीत)
१३) श्री आनंद बाळकृष्ण सुतर (खंबीत)
१४) श्री वासुदेव सोनार (खंबीत)
१५) श्री अंबादास नत्थू सोनटक्के (खंबीत)
१५) श्री गोपाळराव विठोबा वाघ (सरसोली सिक्यूरिटी कैद)
१७) श्री नागदेव विठोबा बिजवे
१८) श्री माधव मारोती वैद्य (आष्टी)
१९) श्री परमेश्वर कालिकाप्रसाद (खडकी)
२०) श्री साहेबराव पुंजाराव नागपुरे (खडकी)
२१) श्री रामभाऊ लोहे (वडाळा)
२२) श्री झापूजी चोटे (वडाळा)
२३) श्री कृष्णा मास्तर (वडाळा)
२४) श्री नत्थू मास्तर (वडाळा)
२५) श्री दलपतराव कोहळे (वडाळा)
२६) श्री मारोती कृष्णाजी कोहळे (दलनाव)
२७) श्री पंजाबराव मानकर (इत्तमगांव)
२८) श्री दामू मारवाडी (खंतोरा)

१७ फरारी आरोपी पैकीपकडलेल्या १० जणांवर समन्स कोर्ट, वर्धा येथे चाललेल्या खटल्याचा निकाल : २१-१०-१९४४

१ श्री. अन्ना दौलतराव पाटील, खडकी निर्दोष मुक्तता
२ श्री नत्थू बाबूजी कुणबी, वडाळा, ३ वर्षे सश्रम करावास
३ श्री दलपत भगवान कुणबी, वडाळा
४. श्री रामराव बकाराम कुणबी, वडाळा, निर्दोष मुक्तता
५. श्री मारोती कृष्णाजी कोहळी, देलवाडी , ३ वर्षे सश्रम करावास

आरोपी क्र.४९ श्री. बंडचाप्पा सदाशिवअप्पा वाणी
आरोपी क्र.५० श्री. बाळ्या बकाराम जवादे, तेली
आरोपी क्र.५३ श्री. शंकर सदोबा कोष्टी
आरोपी क्र.५५ श्री. बालमुकुंद रामलाल बनिया
आरोपी क्र.५६ श्री. शंकर तुळशीराम माळी
आरोपी क्र.५८ श्री. काशिनाथ माळी
आरोपी क्र.५९ श्री. पांडुरंग रामजी माळी
आरोपी क्र.६१ श्री. शामराव नागोबा माळी
आरोपी क्र.६३ श्री. नामदेव बळीराम सोनार
आरोपी क्र.६४ श्री. नत्थू कृष्णाजी रामे
आरोपी क्र.६६ श्री. कृष्णराव गोविंदराव कुणबी
आरोपी क्र.७५ श्री. नत्थू राघोजी नागपूरे (खडकी)
आरोपी क्र.७६ श्री. जानराव आनंदराव कुणबी (खडकी)
आरोपी क्र.७८ श्री. नारायण धबूजी मुंदाने (खडकी)
आरोपी क्र.७९ श्री. चंद्रभान शिवराम नागपुरे (खडकी)
आरोपी क्र.८३ श्री. शामराव राघोजी - नागपुरे (खडकी)
आरोपी क्र.८५ श्री. गंगाधर भगवान नागपूरे (खडकी)
आरोपी क्र.८६ श्री. सूर्यभान धनाजी मुंदाने (नरखापूर)
आरोपी क्र.८७ श्री. वामन गोविंद भडके (नरखापूर)
आरोपी क्र.८८ श्री. बांकेराव विठोबाजी भडके (नरखापूर)
आरोपी क्र.९० श्री. दौलत बालाजी वाघ (सिरसोली)
आरोपी क्र.९२ श्री. विष्णू तात्याजी वाघ (सिरसोली)
आरोपी क्र.९६ श्री. कृष्णराव बळीराम कोहळे (देलवाडी)
आरोपी क्र.१०१ श्री. तुकाराम बकराम महार (अंतोरा)
आरोपी क्र.१०८ श्री. रंगराव व्यंकटराव कुणबी
आरोपी क्र.१०९ श्री. पुत्ता मोहनजी कुणबी
आरोपी क्र.११० श्री. भीमराव राजाराम भिवापुरे कुणबी (किन्हाळा)
आरोपी क्र.११४ श्री. बलदेव बाळकृष्ण कुणबी

(नागपूर हायकोर्टात न्यायमूर्ती गिल यांच्या निवाड्यानुसार फाशी - ऐवजी जन्मठेप)

१. श्री. पांडुरंग कलार
२. श्री. कालेखान विलायतखान
३. श्री. माधव देशमुख
४. श्री. गुलाबराव वाघ

(प्रांतीय सरकार द्वारे फाशीऐवजी जन्मठेप)

१. श्री. बकराम तेली
२. श्री. नत्थू जयराम
३. श्री. रघुनाथ कुंभार
४. श्री. वामन बळीराम तेली

६. श्री. वैंकटी याबलाजी कुणबी, किन्हाळा, निर्दोष मुक्तता
७. श्री. मारोती हणमंतराव मराठा, सिरसोली
८. श्री. पंजाबराव गणपतराव मानकर, इत्तमगांव, जन्मठेप
९. श्री. गणपती किसन भोई, आष्टी. जन्मठेप
१०. श्री. पांडुरंग हिरसा सव्वालाखे, आष्टी, जन्मठेप

निर्दोष मुक्तता

आरोपी क्र. ५ श्री महादेव चिवुजी कलार
आरोपी क्र. ११ श्री गणपतलाल अयोध्यालाल बनीया
आरोपी क्र. १४ श्री लक्ष्मणराव बोराडे माळी
आरोपी क्र. १५ श्री भानुदास बकराम गालपे
आरोपी क्र. १८ श्री शामराव विठोबा कुंभार
आरोपी क्र. १९ श्री महादेव हरी तेली
आरोपी क्र. २६ श्री नत्थू गोविंद तेली
आरोपी क्र. २९ श्री रामकृष्णा उकंड्या न्हावी
आरोपी क्र. ३१ श्री देविदास उर्फ भय्या व. ठाकुरदास बनीया
आरोपी क्र. ३५ श्री पंढरीराव आत्माराम मुकदम
आरोपी क्र. ४३ श्री आत्माराम लहानू न्हावी
आरोपी क्र. ५१ श्री नाना शंकरअप्पा जंगम
आरोपी क्र. ५४ श्री कालूलाल भवरजीदास बनीया
आरोपी क्र. ५७ श्री नारायण सिताराम सोनार
आरोपी क्र. ६५ श्री गुलाब नारायण माळी
आरोपी क्र. ६५ श्री सित्या बालजी माळी
आरोपी क्र. ६७ श्री राजाराम सिताराम घोबी
आरोपी क्र. ६८ श्री खुशाल भजनसा कलार
आरोपी क्र. ६९ श्री हंसराम तुळशीराम कुनबी
आरोपी क्र. ७३ श्री लहान्या उकड्या महार
आरोपी क्र. ७४ श्री शामराव पुंजाजी कुणबी
आरोपी क्र. ८० श्री तुळशीराम हरीसा सोनार
आरोपी क्र. ८२ श्री गुलाब झांगोजी कुणबी
आरोपी क्र. ८४ श्री परमेश्वर कालका प्रसाद
आरोपी क्र. ९१ श्री लक्ष्मण सिताराम कुलवी
आरोपी क्र. ९३ श्री नत्थू जागो मराठा
आरोपी क्र. ९५ श्री पुंडलीक खुशाल कुणबी
आरोपी क्र. ९७ श्री मैपतराव माधवराव कुणबी
आरोपी क्र. ९८ श्री पुंडलीक माधवराव कुणबी
आरोपी क्र. १०० श्री गुणवंत बापुराव कुणबी
आरोपी क्र. १०७ श्री मुरारी इत्तामजी कुणबी
आरोपी क्र. ११२ श्री दामोधर आनंदलाल मारवाडी

आधार

१) बंडखोर खेड्यांची गोष्ट- ले. रमेश गुप्ता, प्रकाशक, रामकृष्ण आप्पा गंजीवाले
२) आष्टी स्वातंत्र्य संग्राम - ले. प्रा. रघुनाथ कडवे

गोवा मुक्तीचा संग्राम

रजि. क्र. ई ८१७७ पुणे
संकलन : चंद्रकांत शहासने
मोबाइल : ९८८१३७३५८५
ई-मेल : chandrakantshahasane@gmail.com



अरौजो मेरिया जोकुना कलिस्टा : जन्म १९२० शिवोली. एन.सी.जी. सदस्य. ३० जानेवारी १९४७ रोजी घरझडतीत राजद्रोही पत्रके मिळाली. रेस मगोस जेलमध्ये डांबले. पुन्हा १५ फेब्रुवारी १९४७ रोजी खटला व २६ जानेवारी १९५७ रोजी २।। महिने शिक्षा व प्रतिदिन २ रुपये असा पंधरा दिवस दंड, ५ वर्षेनागरीक हक्क रद्द. १७ फेब्रुवारी १९५१ ला मुक्त. जानेवारी १९५५ मध्ये सोनाळीमार्गेसत्तरीकडे हद्द ओलांडली. मार्च १९५६ मध्ये पीटर अल्वारीस, मित्रा बीर यांस अटक. १४ वर्षेशिक्षा.



अल्मेडा अनास्टासिओ टोनासिन्हो बार्नेब डे : जन्म १२ जुलै १९५९. मु. वेली-सालसे, पत्रकार १९५० पासून प्र.स. पक्षाच्या लढ्यात मुंबईत नॅशनल काँग्रेस गोवाची शाखा १९५४ साली कलकत्ता येथे चालू केली. १५ ऑगस्ट १९५४ रोजी सत्याग्रह. १५ सप्टेंबर १९५४ रोजी अटक. लष्करी कोर्टाने आठ वर्षेसक्तमजुरी ठोठावली. अगुदा कारागृहात साक्षरता, हस्तलिखित वृत्तपत्र असे उपक्रम. १९६२ साली पहिली एम्प्लॉयिज काँग्रेस स्थापिली. हॉटेल कामगार, छपाई कामगार युनियन स्थापिली.



भट कृष्णनाथ रामचंद्र : जन्म १२ मार्च १९२९, पैगणी- काणकोण. १९ सप्टेंबर १९५६ रोजी तिरंगा फडकावणे, पत्रके वाटणे, निरोप देणे या आरोपात अटक. ३ महिने डांबले, नंतर अगुदा जेलमध्ये. लष्करी कोर्टाने २५ वर्षेशिक्षा ठोठावली. ३० ऑगस्ट १९५७.



भावेशास्त्री गोविंद हरि : जन्म २० जुलै १९१७, Dhaven सत्तरी. वालपोली येथे वाचनालय चालू केले. ३ दिवस कैद. NCG सदस्य. २६ जानेवारी १९५५ रोजी २५ सत्याग्रहींसह सत्याग्रह. ९ वर्षेशिक्षा. दररोज १० एस्कुडोप्रमाणे २ वर्षेदंड, ५ वर्षेराजकीय रद्दबातल. अल्टीनो तुरुंगात सक्तीने मांस तोंडात घातले. वेदशास्त्र संवर्धक मंडळाचे संस्थापक.



अल्मेडा : जन्म १४ जानेवारी १९३२ कलकत्ता. गोवा विद्यार्थी संघ पुणे १९५२ मध्ये सदस्य. १९५४ मध्ये NCG कलकत्ता खजिनदार. कलकत्ता येथे गोवा मुक्तीसाठी खासदारांच्या बैठकीचे आयोजन. गोव्याचा इतिहास, अगोंदा सत्याग्रहींवरील अत्त्याचाराचे वृत्त जगजाहीर केले.



आल्फोन्झो अल्फ्रेड, जन्म : ११ मार्च, १९२४. गालजीबाग - काणकोण. वडील अँथनी फ्रॅन्सीन्स्को: मुंबईत १९४६ पासून गोवामुक्तीचे कार्य. १९५१ साली अटक वॉरंट. नॅशनल काँग्रेस गोवाचे १९५२ मध्ये मुंबई अध्यक्ष. १५ ऑगस्ट, १९५४ रोजी तेरेखोल किल्ला सत्याग्रहींचे नेतृत्व. अटक ३१ मार्च, १९५५ रोजी लष्करी कोर्टाने ८ वर्षेस.म. + ३ वर्षेसाधी शिक्षा ठोठावली. अगुदा किल्ल्यात डांबले.

कर्नाळा चॅरिटेबल ट्रस्ट.

गोवा मुक्तीचा संग्राम

रजि. क्र. ई ८१७७ पुणे
संकलन : चंद्रकांत शहासने
मोबाइल : ९८८१३७३५८५
ई-मेल : chandrakantshahasane@gmail.com



अभ्यंकर अनंत गोविंद, जन्म : १२ ऑगस्ट, १९३२, अंबेड – सत्तरी सत्याग्रही, जनआंदोलन उभे केले. ८ वर्षेशिक्षा व २ वर्षेदंड. २६ जानेवारी, १९५५ च्या ढावेमच्या सत्याग्रहात अटक.



अंगले श्रीकांत वासू पै : जन्म २० फेब्रुवारी १९३४, मडगाव सालसे. ६ एप्रिल १९५५ रोजी मडगाव सत्याग्रह, मारहाण. ११ वर्षेसक्तमजुरी. एनसीजी सदस्य.



अगरवाडेकर यशवंत सुका : १५ जानेवारी १९१८. ओकझल शिवोली प्रभाकर सिनारींच्या गटात पोर्तुगीजांवर अनेकदा हल्ले केले. पकडून देणाऱ्यास ५०००/- रुपयांचे बक्षीस जाहीर. १७ डिसेंबर १९५८ रोजी पोलिसांशी चकमकीत परा येथे वीरमरण.



आचार्य परशुराम श्रीनिवास, जन्म : १९१६, पणजी. गोकर्ण येथे मठाधिपती. आझाद गोमंतक दलास मदत म्हणून सप्टेंबर १९५६ साली अटक करून अमानुष मारहाण. यामुळे २० सप्टेंबर, १९५६ रोजी हुतात्मा. जेलमध्ये.



अल्फोन्झो फ्रान्सिस्को कोरीआ, जन्म : १७ ऑक्टोबर, १८९३. बेनाली-सालसेट एम.ए. (सुवर्णपदक), ऑक्सफर्ड विद्यापीठ पहिले भारतीय सेक्रेटरी. गोवा लिबरेशन आर्मी – १९५४ चे संस्थापक सदस्य. विविध लेख लिहून प्रतिनिधीत्व केले.



आचार्य रामकृष्ण सुखा, जन्म : ३० सप्टेंबर, १९३१. लोलीम-काणकोण. २६ जानेवारी, १९५५ रोजी लोलीम येथे सत्याग्रह; ६ जून, १९५५ ला अटक. ८ वर्षेस. म. आणि दंड म्हणून अजून २ वर्षेस.म.



अणवेकर केदार विनायक : जन्म १९२०, चिंचणी सालसे. एजीडी सदस्य. गोवा रेडिओ, बंबोली नोकरी. सत्याग्रहींना आश्रय दिला. रेडिओ स्टेशन बॉम्बने उडविण्याच्या प्रयत्नात ५ जुलै १९५५ रोजी बॉम्बचा वेळेपूर्वी स्फोट झाल्याने वीरमरण.



भतरे गंगा विष्णू ऊर्फ घनश्याम शामलाल : जन्म ५ नोव्हेंबर १९१८, बिओरा राजघाट, मध्यप्रदेश. मॅट्रिक, पी.टी. डिप्लोमा. दि. १५ ऑगस्ट १९५५ च्या सत्याग्रहात दुधसागर बोगदा क्र. १० येथे पोर्तुगीजांच्या अमानुष गोळीबारात अन्य ६ जणांसह वीरमरण.

कर्नाळा चॅरिटेबल ट्रस्ट, पुणे
रजि. क्र. ई ८१७७ पुणे

बलिदानाचा इतिहास - विदर्भ


संकलन : देशभक्तकोशकार चंद्रकांत शहासने
मो. ९८८१३७३५८५
ईमेल : chandrakantshahasane@gmail.com




उमरकर विठ्ठल सदाशिव : जन्म १९२० : वडशिंगी, बुलढाणा. १९४२ च्या लढ्यात स्थानबद्ध. नंतर आमदार.



कलाल हिरालाल बिहारीलाल : जन्म १९१४–१९४२ : खडकी– वर्धा, १९४२ च्या आष्टीच्या लढ्यात पोलिसांच्या बेधूंद गोळीबारात हुतात्मा.



काकडे कृष्णराव महादेव : जन्म १९२० : नागपूर, १९४२ साली पोलिसांनी जमावावर केलेल्या गोळीबारात वीरमरण.



खमेले नारायण हरीसाब : जन्म : १८९७–१९४२ नागपूर, १९४२च्या चळवळीत नागपूर येथील पोस्ट ऑफिसवर हल्ला करून लोक ते जाळीत असता पोलिसांनी केलेल्या गोळीबारात ठार झाले.



खराबे भय्या दयाराम : जन्म १९१९ : वडोदा, १९४२ च्या चळवळीत पोलीस स्टेशनवर हल्ला करून कागदपत्रांची जाळपोळ केल्याबद्दल ३ वर्षे सक्तमजूरी.



गोखले संभाजीराव विनायकराव : जन्म १८९० : अमरावती, बी.ए., एल.एल.बी., १९३० च्या चळवळीत ६ महिने सक्तमजूरी १९३७ ते १९४० मध्ये मध्यप्रदेश कायदेमंडळाचे सदस्य व मंत्री होते. १९४०च्या वैयक्तिक सत्याग्रहात ४ महिने स्थानबद्ध. १९४२ च्या चळवळीत विध्वंसक संशयावरून ९ महिने स्थानबद्ध.


कर्नाळा चॅरिटेबल ट्रस्ट, पुणे
रजि. क्र. ई ८१७७ पुणे

बलिदानाचा इतिहास - विदर्भ


संकलन : देशभक्तकोशकार चंद्रकांत शहासने
मो. ९८८१३७३५८५
ईमेल : chandrakantshahasane@gmail.com



गोंड पंची पोलसू : जन्म १९२०-१९४२ : वडाळा-आर्वी-वर्धा, १९४२च्या 'चले जाव'-चळवळीत अष्टी येथे झालेल्या गोळीबारात ठार.




ठोसर नारायण रघुनाथ : जन्म १९०४. मलकापूर, १९३० च्या सविनय कायदेभंगात कारावास भोगावा लागाला.




देशमुख गोपाळराव हिंमतराव : १० जाने. १९२२ उगवा. चलेजाव छळवळीत गुप्त पत्रकांचे वाटप, कारावास व सक्तमजूरी ४ ऑक्टो. १९९६ रोजी निधन.



देशमुख जगन्नाथ ऊर्फ आण्णासाहेब : १० ऑक्टो. १९२२. पळसखेड १९४० पासून सेवाग्राम आश्रमात चळवळीत कार्य. कारावास भोगला. स्वतःची जमीन भूदान केली. १८ मे २००३ मध्ये निधन.



धोत्रे जगदेव गोविंद : १९२४. मॅट्रिक, अकोला. १९४२ च्या स्वातंत्र्य लढ्यात भूमिगत कारवाया. राष्ट्रीय शाळेतून संस्कार. ६ महिने सक्तमजूरी.



भोपळे संपत भाऊजी : १९०९ : हिवरखेड, १९३० च्या कायदेभंगाच्या १ वर्ष, १९२२ च्या जंगल सत्याग्रहात दीड वर्ष व १९४० च्या सत्याग्रहात भाग घेतल्याबद्दल ४ महिने सक्तमजूरी, १९४२ च्या 'चले जाव' च्या चळवळीत दीड वर्ष स्थानबद्ध. १९३६ ते १९४१ मध्यप्रदेश विधानसभेचे सदस्य.


कर्नाळा चॅरिटेबल ट्रस्ट, पुणे
रजि. क्र. ई ८१७७ पुणे

बलिदानाचा इतिहास - विदर्भ

संकलन : देशभक्तकोशकार चंद्रकांत शहासने
मो. ९८८१३७३५८५
ईमेल : chandrakantshahasane@gmail.com



महल्ले शंकर दाजीबा : १९२५-१९४३ : नागपूर, १९४२ च्या 'चले जाव' च्या चळवळीत पोलीस चौकीवर हल्ला करून पोलीस शिपायास ठार केल्याबद्दल फाशीची शिक्षा झाली व तारीख १९ जानेवारी १९४२ रोजी फाशी देण्यात आली.



यावलीकर पंजाबराव बापूराव : १९१३ : यावली, १९४२च्या 'चले जाव' च्या चळवळीत पोलीस स्टेशनचा ताबा घेण्याचा प्रयत्न केल्याबद्दल ५ वर्षे सक्तमजूरी स्वातंत्र्या मिळाल्यानंतरच तुरुंगातून सुटका झाली. यावली येथे पोलिसांनी केलेल्या गोळीबारात १९ ऑगस्ट १९४२ रोजी जे सात लोक ठार झाले.



सखाराम रुईकर रामचंद्र : १९०२-१९५९ नागपूर, बी.ए.एल.एल.बी., १९३० च्या चळवळीत २ वर्षेव १९३२ च्या चळवळीत ६ महिने सक्तमजूरी



रंगारी जमना कृष्णा : १४२ : मोवाड, 'चले जाव' च्या चळवळीत पोलिसाने केलेल्या गोळीबारात ठार.




वाघ गुलाबराव विठ्ठलराव : १९१२ : सिरसोळी-आर्वी, 'चले जाव' च्या चळवळीत आष्टी घातपात प्रकरणात भाग घेतल्याबद्दल फाशीची शिक्षा.



वाघ गोपाळ विठ्ठल : १९०२ : सिरसोळी : १९४१ च्या वैयक्तिक सत्याग्रहात भाग घेतल्याबद्दल प्रथम चार व नंतर सहा तसेच १९४२ च्या 'चले जाव' च्या चळवळीत २. वर्षे सक्तमजूरी.

बलिदानाचा इतिहास - विदर्भ

संकलन : देशभक्तकोशकार चंद्रकांत शहासने
मो. ९८८१३७३५८५
ईमेल : chandrakantshahasane@gmail.com



बँकॉक येथे भरलेली हिंदी स्वातंत्र्याची पहिली कॉन्फरन्स (१५ जून १९४२)
खुर्चीवर मध्यभागी रासबिहारी बोस व त्यांचे डाव्या बाजुला ज्ञानेश्वर देशपांडे (डावीकडून) उभ्या ओळीत पहिले विनायक सुपनेकर. (श्री विनायक सुपनेकर यांचे सौजन्याने)

कर्नाळा चॅरिटेबल ट्रस्ट, पुणे
रजि. क्र. ई ८१७७ पुणे

बलिदानाचा इतिहास - विदर्भ


संकलन : देशभक्तकोशकार चंद्रकांत शहासने
मो. ९८८१३७३५८५
ईमेल : chandrakantshahasane@gmail.com



मातोश्री जिजाऊसाहेब




मोरोपंत जोशी



वीर वामनराव जोशी



मुंजे



छत्रपती आप्पासाो



रा. ब. मुधोळकर



क्रांतिवीर खानखोजे



लोकनायक अणे


कर्नाळा चॅरिटेबल ट्रस्ट, पुणे
रजि. क्र. ई ८१७७ पुणे

बलिदानाचा इतिहास - विदर्भ

संकलन : देशभक्तकोशकार चंद्रकांत शहासने
मो. ९८८१३७३५८५
ईमेल : chandrakantshahasane@gmail.com



खापर्डे



गुलाबराव महाराज




हरिसिंग गौर




गजानन महाराज



सोमण



तुकडोजी महाराज



आचार्य विनोबाजी भावे



शिवरामसा तुकासा सावजी

कर्नाळा चॅरिटेबल ट्रस्ट, पुणे
रजि. क्र. ई ८१७७ पुणे

बलिदानाचा इतिहास - विदर्भ

संकलन : देशभक्तकोशकार चंद्रकांत शहासने
मो. ९८८१३७३५८५
ईमेल : chandrakantshahasane@gmail.com



अनुसयाबाई काळे




आबासाहेब खेडकर



भाऊजी कावरे



ज्ञानेश्वर सखाराम देशपांडे



ब्रिजलाल बियाणी



बॅ. रामराव देशमुख



डॉ. हेडगेवार



मंचरशा आवारी

कर्नाळा चॅरिटेबल ट्रस्ट, पुणे
रजि. क्र. ई ८१७७ पुणे

बलिदानाचा इतिहास - विदर्भ


संकलन : देशभक्तकोशकार चंद्रकांत शहासने
मो. ९८८१३७३५८५
ईमेल : chandrakantshahasane@gmail.com



डॉ. खरे



द्वारकाप्रसाद मिश्रा




संत गाडगेबाबा




पार्वतीबाई पटवर्धन



पन्नालाल व्यास



कृष्णदास महाराज सातारा



कानडे शास्त्री



लोकमान्य टिळक

कर्नाळा चॅरिटेबल ट्रस्ट, पुणे
रजि. क्र. ई ८१७७ पुणे


बलिदानाचा इतिहास - विदर्भ

संकलन : देशभक्तकोशकार चंद्रकांत शहासने
मो. ९८८१३७३५८५
ईमेल : chandrakantshahasane@gmail.com


अहिल्याबाई नागपूरे



बंदुकाबाई घटवाई


दुर्गाताई जोशी


गोपिकाबाई फुलझडे


कलावती नागपूरे


प्रमिलाताई ओक


कालकाबाई झिरे


कौशल्याबाई गौर


लक्ष्मीबाई देशमुख



विजयालक्ष्मी मुश्रवाला


प्रभावतीबाई भोपे



अच्च्युतराव देशपांडे


प्रभावतीबाई जकातदार


प्रमिलाताई अजिक


शांताबाई ना. मानकर


श्रीमती. राधाबाई गोयंका


सिताबाई कोकमकर


कर्मयोगी पंधे गुरूजी


कर्नाळा चॅरिटेबल ट्रस्ट, पुणे
रजि. क्र. ई ८१७७ पुणे

बलिदानाचा इतिहास - विदर्भ


संकलन : देशभक्तकोशकार चंद्रकांत शहासने
मो. ९८८१३७३५८५
ईमेल : chandrakantshahasane@gmail.com


सुंदराबाई चाने


ताराबेन मुश्रवाला


वेणूताई चौधरी


यमुनाबाई पाटील



वाडीघरे जंगलू नारायण : १९२४ : नागपूर, 'चले जाव' च्या चळवळीत पोलीस चौकीवर हल्ला करणाऱ्या जमावावर झालेल्या गोळीबारात ठार झाले.


कालकाबाई झिरे


बालाजी हुद्दार



वासुदेव फडणीस


बापुसाहेब सहशस्त्रबुद्धे



होले मोतीराम भीमाजी : १९२३ : आष्टी, बी.ए., बी.टी., १९४२ च्या 'चले जाव' च्या चळवळीत भूमिगत राहून कार्य केले, सरकारी पकड वॉरंट.


शिवनामे आण्णासाहेब


जोशी भास्करराव


दातार एम.जी.


देशमुख माणिकराव

कर्नाळा चॅरिटेबल ट्रस्ट, पुणे
रजि. क्र. ई ८१७७ पुणे

बलिदानाचा इतिहास - जळगाव

संकलन : देशभक्तकोशकार चंद्रकांत शहासने
मो. ९८८१३७३५८५
ईमेल : chandrakantshahasane@gmail.com



कुलकर्णी भालचंद्र आर. :
जन्म १२/११/१९१५, जळगांव. स्वातंत्र्यवीर सावकरांच्या मागदर्शना प्रमाणे हैद्राबाद सरहद्दीवर सत्याग्रह केला व ११ महिने कारावास. जानवे व होम हवन यासाठी कारागृहात सत्याग्रह.



कोळी जयराम तुळशीराम :
जन्म. कुरवेल चोपडे .परदेशी वस्तूंची होळी.घातपाती कारवाया. सहा महिने शिक्षा. हजर जबाबीपणाबद्दल इंग्रज अधिकाऱ्यांने शाल देऊन कौतुक केले.



खंडेलवाल माम रामजी :
परतवडा, कोरकू व गौड सहकाऱ्यांच्या मदतीने अचलपूर बऱ्हाणपूर डोंगराळ भागात स्वातंत्र्य लढ्याचा प्रचार केला.



चौधरी धनाजी नाना : १८९१-१९५२ खिरोदे - रावेर इंटर,१९३० साली पोलीस खात्यातील नोकरीचा राजीनामा. १९३१ साली स्वतःचा आश्रम - मातृभाषा प्रचार, खादी, स्त्री शिक्षण, अस्पृश्यता निवारण, हिंदु-मुस्लीम ऐक्य यांची शिकवण देऊन स्वा. सैनिक तयार केले. १९३२ मधे १५ महिने शिक्षा, आश्रम जप्त झाला. १९३६ फैजपूर अधिवेशन सेक्रेटरी,अखिल भा. कॉ.क.सेक्रेटरी.१९३५ विधानसभेवर आमदार. १९४२ साली अटक,१ वर्ष स्थानबद्ध, हरिजन - गिरीजन सर्वोदय केन्द्रकार्य.



गुजराती मोतीलाल कन्हैयालाल :
चोपडे : मॅट्रिक १९४२ च्या लढ्यात ४ महिने सक्तमजूरी



चौधरी दयाराम रेवा :
१९१३, फैजपूर, ता, यावल, १९३१ ३२, ३६, ४२ पासून वेळोवेळी लढ्यात अटक कारावास, भूमिगत कारवाया.

कर्नाळा चॅरिटेबल ट्रस्ट, पुणे
रजि. क्र. ई ८१७७ पुणे

बलिदानाचा इतिहास - जळगाव

संकलन : देशभक्तकोशकार चंद्रकांत शहासने
मो. ९८८१३७३५८५
ईमेल : chandrakantshahasane@gmail.com



चौधरी निनू कान्हू :

जन्म १९२०, कोथली १९४२ लढ्यात ६ महिने व १९४३ मध्ये ६ महिने स.म.



देशपांडे माधवराव मार्तंड राव:

स्वातंत्र्य लढ्यासाठ निधी म्हणून २० हजार रूपयांची एक रकमी देणगी काँग्रेसक डेजमा के ली.



तायडे दशरथ हिरामण चितोडे :

मॅट्रि क.१९४२ च्या लढ्यातसाडे दहा महिने स.म. १९५४ साली गोवामुक्तीआमदार.



धनगर नारायण बापू :

चले जावच्या लढ्यात अमळनेर येथे मामलेदाराचा टंगा जाळला. सुभाष चौकात गोळीबारात पायाला गोळी लागली. अल्पवयीन तरी माफी मागण्यास नकार दिला म्हणून सहा महिने सक्तमजूरी ८/९/१९९७ मृत्यू.



देवकीनंदन नारायण :

जन्म १८९९, –जळगाव असहकार चळवळीत ५ वर्षे कारावास.काँग्रेसच्याविविध उच्चपदाचे मानकरी.



परदेशी शंकर फुन्नू :

जन्म ८/८/१९०८, शेंदुर्णी १९३० पासून चळवळीत. १९४२ मध्ये पहुर पोलिस चौकी, पोस्ट , चावडी जाळली. गोळीबार झाला. कारावास.


कर्नाळा चॅरिटेबल ट्रस्ट, पुणे
रजि. क्र. ई ८१७७ पुणे

बलिदानाचा इतिहास - जळगाव

संकलन : देशभक्तकोशकार चंद्रकांत शहासने
मो. ९८८१३७३५८५
ईमेल : chandrakantshahasane@gmail.com



पाटील उत्तमराव गीरधर : जन्म १९११ – परगणे ड ांगरी – आयुर्वेद विशारद. १९३० – ३२ मीठ – क ायदेभंगात ८ महिने स.म. निर्बंध तोड ले १ वर्ष स.म. व १०० रु. दंड ,१९४० वै. सत्याग्रह, युद्धविरोध ६ महिने स.म. १९४२ भूमिगत, जाळपोळ, लुट ,विध्वंस – स्थावर – जंगम इस्ट ेटजप्त. चिमठ ाणचा साड े पाच लाखाचा खजिना लुट ण्यास प्रमुख. १९४० साली पंढ रपूरातअट कव पलायन आमदार.



पाटील तुळाजी झगा :
जन्म १९२२, हिरापूर : १९४२ मध्ये भूमिगत. १९४३ साली पंजाब पेशावर एक्स्प्रेस पाड ली.



पाटील दशरथ गिरीधर :
जन्म १९२३–१९४७, परभणे ड ांगरी – उत्तमरावांचा भाऊ – १९४२ मध्ये ६ महिने स.म.



पाटील भाऊराव माणिकराव :
चहाड ी: १९३२ साली १५ फ क्क्यांची शिक्षा व १९४२ साली १ वर्ष स.म.



पाटील माधव गोटू :
जन्म १९१० चोपड े : मॅट्रि क १९२६ पासून राष्ट्र ीय क ार्यात १ महिना क ारावास. १९४२ साली स्थानबद्ध. क ाँग्रेस पदाधिक ारी आमदार.



पाटील ललिलाताई उत्तमराव :
जन्म १९२१ परभणे ड ांगरी नर्सिंग क ोर्स, १९४०–४१ युध्द विरोधी भाषणे – दीड महिना स. म.,१९४२ ला अमळनेरला मिरवणूक ीत जाळपोळ, मोड तोड – साड े पाच वर्षे स. म. उत्तमरावांची पत्नी. येरवड ा जेल मधून पलायन.

कर्नाळा चॅरिटेबल ट्रस्ट, पुणे
रजि. क्र. ई ८१७७ पुणे

बलिदानाचा इतिहास - जळगाव

संकलन : देशभक्तकोशकार चंद्रकांत शहासने
मो. ९८८१३७३५८५
ईमेल : chandrakantshahasane@gmail.com



पाटीलवेणूताई गिरीधर :
१८९०-१९४५ परभणे डांगरी, १९३० पासून चळवळ, १९४२ मधे भूमिगतांना सर्व साह्य.१९४५ मध्ये ६ महिने स. म. उत्तमरावांची आई.




पाटीलसोना कौतिक :
१९०२-१९४४ आमोदे, यावल, १९४०-४१ युध्दविरोध, २ महिने स. म. १९४२ सभा मिरवणूका २ वर्षे सक्तमजूरी



पाटीलशिवाजीराव गिरीधर :
परभणे - ड ांगरी,मॅट्रि कअंमळनेर जाळपोळ खट ला- १० वर्षे सक्तमजूरी २६ जाने. १९४३ जेल पलायन. १९४४ भूमिगत. क ानपूरला अट क .१९६० - आमदार - मंत्री - वगैरे. उत्तमरावांचा बंधू.



बिर्ला सीताराम हिराचंद : १९१०-१९६६
एरंड ोल.१९३० मध्ये असहक ाररू .५० दंड अथवा ३ महिने शिक्षा, १९३२ क ायदेभंग - १ वर्षे सक्तमजूरी शिक्षा. १९३३ मध्ये २ वर्षे सक्तमजूरी व १०० रू .दंड . १९४१ युध्दविरोध - १०० रू .दंड अथवा दीड महिना सक्तमजूरी., पुनः अट क ,१५ महिने शिक्षा अगर रू . २००० दंड, १९४२ मध्ये स्थानबद्ध. १९४६ विधानसभेवर विविध संस्था, समाजसेवा, उद्योग



पाटीलसुभानराव तोताराम :
भादली - आयुर्वेद तीर्थ, मीठ, जंगल १९३०सत्याग्रह, अल्पवयीन - ८-फट के ,मराठी शाळेवर तिरंगा लावला ४० दिवस स. म. १९३२ ला जळगाव येथे ६ महिने स. म. १९४३ पासून भूमिगत.



भालेराव सदाशिव नारायण :
कोनळदे : बी.ए. १९३२ साली ४ महिने स.म. + फ ट के४३ साली राजद्रोहाचा खट ला.आमदार.

कर्नाळा चॅरिटेबल ट्रस्ट, पुणे
रजि. क्र. ई ८१७७ पुणे

बलिदानाचा इतिहास - जळगाव

संकलन : देशभक्तकोशकार चंद्रकांत शहासने
मो. ९८८१३७३५८५
ईमेल : chandrakantshahasane@gmail.com



भोगे रामभाऊ धोंडोपंततथा डॉ.भोगे :

१९१२ सावदे. १९३०-३२ कायदेभंगात, जंगल सत्याग्रहात सहभाग, एकूण २७ महिने सक्तमजूरी व ४२० रुपये दंड ,१९४२ मध्ये भूमीगत -मालमत्ता जप्त ७ वर्षे सक्तमजूरीची शिक्षा झाली.




लेले केशव गोविंद :

जन्म ८/११/१९०८, जळगाव. १९३६ पासून चळवळीत. १९४० च्या वैयक्तिक सत्याग्रहात ५० जणांचे पथक. पाळधी व वाघोड येथे सत्याग्रह ९ महिने शिक्षा.



विसपुते विश्वनाथ दगडू :

जन्म १/१/१९२५, जळगाव. साने गुरुजींच्या बरोबर यावल, रावेर भागात लढचाचा प्रसार व भूमिगत कारवायायामुळे पकडवॉरंट .



शिंदे गुरूजी नथू संपत :

जन्म २१/९/१९१८, १९३० पासून चळवळीत. १९४२ मध्ये शाळेवर झेंडा महिने लावून विक्टोरिया राणीचे फोटो फाडले.१८ ऑगस्ट रोजी जे. एम. कोरीन (कलेक्टर)च्या गाडीसमोर आडवे पडले. साळी पोलिसांनी बरगडीतसंगीनिने भोसकले.



फैजपूर काँग्रेस स्वागत मंडळ कचेरी

कर्नाळा चॅरिटेबल ट्रस्ट

मराठवाडा मुक्तिसंग्राम क्रांतिवीरांचे सचित्र प्रदर्शन


रजि. क्र. ई ८१७७ पुणे
संकलन : चंद्रकांत शहासने
मोबाइल : ९८८१३७३५८५
ई-मेल : chandrakantshahasane@gmail.com

राजकीय लढ्यातील महत्त्वाचा घटनाक्रम

- १९३० आंध्र परिषदेची स्थापना.
- १९३७ कर्नाटक परिषदेची स्थापना.
- १९३७ महाराष्ट्र परिषदेची स्थापना.
- १९३८ लातूर येथे महाराष्ट्र परिषदेचे दुसरे अधिवेशन: अध्यक्ष-श्रीनिवासराव बोरीकर.
- ऑगस्ट १९३८ ला हैदराबाद स्टेट काँग्रेसची रीतसर स्थापना होण्यापूर्वीच निझाम सरकारची बंदी.
- २१ ऑक्टोबर १९३८ रोजी हिंदू महासभेतर्फे पहिला सत्याग्रह.
- २४ ऑक्टोबर रोजी स्टेट काँग्रेसतर्फे पहिला सत्याग्रह.
- ऑक्टोबर ३८ ते ऑगस्ट १९३९ पर्यंत आर्यसमाज व हिंदूमहासभेचे आंदोलन.
- नोव्हेंबर १९३८ वंदेमातरम् चळवळ.
- डिसेंबर १९३८ वंदेमातरम् गीतावर बंदी.
- १९४१ उमरी येथे महाराष्ट्र परिषदेचे ३रे अधिवेशन : अध्यक्ष-काशिनाथराव वैद्य.
- १९४३ औरंगाबाद येथे महाराष्ट्र परिषदेचे ४ थे अधिवेशन : अध्यक्ष-बॅ.श्रीधर वामन नाईक.
- १९४४ तिन्ही परिषदांची सूत्रसंचालन समिती स्थापन.
- १९४५ सेलू येथे ५ वे अधिवेशन : अध्यक्ष - दिगंबरराव बिंदू.
- १९४६ लातूर ला ६ वे अधिवेशन : अध्यक्ष - आ.कृ.वाघमारे.
- ३ जुलै ला १९४६ स्टेट काँग्रेसवरची बंदी उठविण्यात आली.
- जून १९४७ ला हैदराबाद स्टेट काँग्रेसचे १ ले अधिवेशन: अध्यक्ष-स्वामी रामानंदतीर्थ, स्वतंत्र भारतात सामील होण्याची या अधिवेशनातील प्रमुख मागणी.
- ऑगस्ट १९४७ ते सप्टेंबर १९४८ सशस्त्र लढा.
- ७ ऑगस्ट १९४७ ला हैदराबाद स्टेट काँग्रेसचा लढा सुरू - झेंडा दिन.
- १५ ऑगस्ट १९४७ भारत स्वतंत्र झाला.
- २ डिसेंबर १९४७ ला भारत सरकार व निझाम यांच्यात 'जैसे थे करार'.
- १३ सप्टेंबर १९४८ रोजी 'ऑपरेशन पोलो' या नावाने हैदराबाद संस्थानविरुद्ध 'पोलिस-ॲक्शन' प्रारंभ.
- १७ सप्टेंबर १९४८ रोजी निझामाची शरणागती. मुक्तिलढ्याची सांगता.









देशभक्तीच्या गळयात फाशी, पाठीवरती मार ।
वीर स्मारके उदास पडती, सदा तिथे अंधार ॥
देशासाठी लढता लढता, पडलो धारातीर्थी
नका करू आरती आमुची, नका करू आरती ॥

महाकवी - श्री. चंद्रकांत शहासने



कर्नाळा चॅरिटेबल ट्रस्ट

मराठवाडा मुक्तिसंग्राम क्रांतिवीरांचे सचित्र प्रदर्शन

रजि. क्र. ई ८१७७ पुणे
संकलन : चंद्रकांत शहासने
मोबाइल : ९८८१३७३५८५
ई-मेल : chandrakantshahasane@gmail.com



लोहपुरुष स्वामी स्वतंत्रतानंद
संचालक आर्य सत्याग्रह, हैद्राबाद.



भाई बन्सीलाल
आर्य समाजाचे नेते. हैद्राबाद लढयात हजारो सत्याग्रही तयार केले.



दिपाजी शिवरामजी पाटील
दाती कळंबनूरी. शेंबाळ पिंपरी कॅम्पचे सेनापती.



वंदे मातरम रामचंद्रराव
हैद्राबाद मुक्ती लढयात प्राणाची बाजी लावली.
आर्य समाजी स्वातंत्र्यवीर सावरकर यांना वंदे मातरम पदवी दिली.



माडपाटी हनुमंतराव
आंध्रमहासभेचे संस्थापक



माडपाठी रामचंद्रराव
स्टेट काँग्रेस चिटणीस तेलंगणा.



जे. के. प्रणेशाचार्य
स्टेट काँग्रेस कृति समिती चिटणीस तेलंगणा.



रवि नारायण रेड्डी
हरीजन सेवक संघ स्टेट काँग्रेस सत्याग्रही.
हैद्राबाद कम्यूनिस्ट पक्षाचे संस्थापक.

कर्नाळा चॅरिटेबल ट्रस्ट

मराठवाडा मुक्तिसंग्राम क्रांतिवीरांचे सचित्र प्रदर्शन


रजि. क्र. ई ८१७७ पुणे
संकलन : चंद्रकांत शहासने
मोबाइल : ९८८१३७३५८५
ई-मेल : chandrakantshahasane@gmail.com



कुसुमताई जोशी
जन्म. 1922 घरी हँडप्रेसवर बुलेटीन्स छापले.
रात्री वाटप. भूमिगतांना आश्रय.



शकुंतलाबाई साले
1914 ते 1959. उस्मानाबाद, आंबेजवळगा.
हनुमान टेकडी शाळा सुरू केली.गुप्त पत्रके वाटप.



गंगुताई देव (बंडाळे,)
औंढा नागनाथ. 16 महिने 50-60 कार्यकर्त्यांची
